संगीतकारची छड़ी

लेखक : सिड

संगीतकारची छड़ी

मराठी : अर्चना कुलकर्णी

आर्टुयो एक प्रसिद्ध संगीतकार होता.

छडीच्या सहाय्याने अनेक गाण्यांना सुमधुर संगीत देत असे.
जेंव्हा तो छडी हलवे तेंव्हा ऑर्केस्ट्रा संगीत वाजवू लागे.

जेंव्हा तो जोरात आपली छडी फिरावे तेंव्हा ट्रमपेट वाजू लागे
आणि जेंव्हा हळुवार पणे छडी फिरवे तेंव्हा व्हायोलिन वाजू लागे.



ऑर्केस्ट्रा सम्पल्यावर सगळे प्रेक्षक
परत वाजवा असा घोष करत.

संगीत समारोह सम्पल्यावर प्रेक्षक आर्टुयोला
घेरून टाकत आणि प्रेमाने फुलांचा गुच्छ भेट करत.

आर्टुयो म्हणायचा, “मी तुमच्या सगळ्यांचा खूप खूप आभारी आहे,
मी माझ्या ह्या काठीचा सुध्दा खूप आभारी आहे, हिच्या शिवाय
इतकं सुमधुर संगीत संचलन करणं मला शक्यच झालं नसतं.”

नेहमीप्रमाणे असा कारेक्रम झाल्यावर आर्टुयोचा मॅनेजर
फेलिक्स ने त्याला कार ने घरी आणले आणि म्हणाला,
“लक्षात आहे ना उद्या तुम्हांला वर्ल्ड टूर ला जायचं आहे.”

घरी पोचताच नोकराणीने त्याला गरम गरम दूध प्यायला दिलं, त्याचा कुत्रा टसकिनीने त्याला चपला आणून दिल्या. त्याच्या नोकराने त्याला बदलायला रात्रीचे कपडे सुद्धा आणून दिले.

त्यानंतर आर्टुयो आपल्या बिछान्यावर झोपला त्याने आपली छडी आपल्या बाजूला ठेवली.

पण सकाळी ती छडी तिथून गायब झाली.

आरटूरोने गुढग्यावर बसून सगळीकडे शोधलं.

त्याचा मॅनेजर एलिक्सने शोधलं

त्याच्या नोकरांनी एव्हढं च नाही त्याचा कुत्रा टसकीनी ने सुद्धा

शोधायला मदत केली पण छडी काही मिळाली नाही.

आता छडी शिवाय तो संगीत कसं देणार?
आर्टुयो ओरडला, “संगीत समारोह रद्द करा, वर्ल्ड टूर रद्द करा!”

फेलिक्स त्याला म्हणाला “वर्ल्ड टूर रद्द करणं शक्य नाही.
सगळी तिकिटं विकली गेली आहेत,
तुम्हांला दुसर्या छडीचा वापर करावा लागेल.”



नंतर फेलिक्स आर्टुयोला कार मधून
एका संगीत वाद्य असलेल्या दुकानात घेऊन गेला.

तिकडे आर्टुयोने एक एक
छडी उचलून त्याची पहाणी केली.
“ही लहान आहे”, “ही मोठी आहे”, “ही हलकी आहे”,

“ही जड आहे”, सगळ्या छड्या बेकार आहेत.
मी छडी शिवाय संगीत देऊ शकणार नाही.”

तेंव्हा फेलिक्स म्हणाला, “तुम्ही एक महान संगीतकार आहात.
ऑर्केस्ट्राचे संकलन करायला तुम्हाला छडी कशाला पाहिजे हातांचा
उपयोग करून ही तुम्ही संगीत संचलन देऊ शकता.”
“नाही मला जमणार नाही,” आर्टुयो म्हणाला.
“एकदा प्रयत्न तर करून बघा,” फेलिक्स म्हणाला.

मग ते लगेचच ऑर्केस्ट्रा असलेल्या खोलीत गेले.

आर्टुयो मंचावर गेला.

“माझ्या खूप-खूप शुभेच्छा,” फेलिक्स म्हणाला.

आर्टुयो ऑर्केस्ट्राच्या समोर उभा राहिला
आणि हात हलवायला सुरवात केली.

जेंव्हा त्याने जोरात हात हलवले तेंव्हा ट्रम्पपेट वाजू लागलं आणि
जेंव्हा हळुवारपणे हात हलवला तेंव्हा व्हायोलिन वाजू लागलं.



परत वाजवा, परत वाजवा प्रेक्षक ओरडू लागले.



ते स्टेजवर आले त्यांनी आर्टुयोच्या पायाशी फुलं फेकली.



“वा मालक तुम्ही तर कमालचं केलीत, इतका सुमधुर ऑर्केस्ट्रा मी आत्तापर्यंत एकला नव्हता,” फेलिक्स म्हणाला.
“तू बरोबर म्हणत होतास, मी खरंच एक उत्तम संगीत संचालक आहे,” आर्टुयो फेलिक्सच्या कानात म्हणाला.

ड्रेसिंग रूम मधे नोकर आणि नोकराणी त्याची वाटच बघत होते.
“हे बघा आम्हाला काय मिळालं!” ते म्हणाले.

त्याच्या समोर त्याचा कुत्रा टस्कनी उभा होता
आणि त्याच्या तोंडात आर्टुयोची छडी होती.

"मी आभारी आहे तुझा टस्कनी,
पण मला आता ही छडी नको,
तूच तुला खेळायला घे ती आता."

त्या नंतर आर्टुयो वर्ल्ड टूर ला गेला.

समाप्त